**ILU-HA**
**INTERNATIONAL LEPROSY UNION-HEALTH ALLIANCE**
C/o. CASP BHAVAN : Survey No. 132/2, Plot No. 3, Pashan Baner Link Road,
Pune 411 021. INDIA Tel.: 32317932
E-mail : ilupune@gmail.com Website : www.ilu.org.in

**Dr. S. D. Gokhale** Hon. President | **Dr. M. D. Gupte** Ex President | **Mr. R. H. Belavadi** Vice-President | **Mrs. R. S. Gopkhale** Hon. Secretary | **Mr. Diloip Satbhai** Hon. Treasurer

**24 नोव्हेंबर 2012**

**कृपया प्रसिद्धीसाठी**

## इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे राम नाईक अध्यक्ष, तर चंद्रशेखर धर्माधिकारी मार्गदर्शक

**पुणे, शनिवार** : कुष्ठपीडितांसाठी आंतरराष्ट्रीय कीर्तिचे काम करणा-या इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या अध्यक्षपदी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याचप्रमाणे माजी न्यायमूर्ति श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना संस्थेने ‘मार्गदर्शक’ (पेट्रन) म्हणून सन्मान दिला आहे. इंटरनॅशनल लेप्रसी युनियनने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे.

इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या पुणे येथे शुक्रवारी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ही निवड करण्यात आली. देशभरातील कुष्ठपीडितांसाठी काम करणा-या संस्थांना बरोबर घेऊन कुष्ठपीडितांच्या सक्षमीकरणासाठी श्री. राम नाईक करीत असलेले प्रयत्न सर्वश्रुत आहेत. त्यामुळेच गेल्या वर्षी इंटरनॅशनल लेप्रसी युनियनने कुष्ठपीडितांच्या मानवी हक्क संरक्षणासाठी नेमलेल्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्षपद श्री. राम नाईक यांना दिले होते. त्यानंतर आता श्री. नाईक यांच्या मार्गदर्शनाचा कुष्ठपीडितांना सातत्याने लाभ मिळावा यासाठी त्यांची संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. डॉ. शरदचंद्र गोखले इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे मानद अध्यक्ष आहेत.

**Mr. Sanket Chiplunkar**, Programme Officer

Registered under Bombay Public Trust Act 1950 : Registration No. F-4367 (Pune)
The Societies Registration Act. 1860 Registration No. Maharashtra/3301/1987/Pune



**इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या अध्यक्षपदी दिनांक 23 नोव्हेंबर 2012 रोजी बिनविरोध निवड झाल्यानंतर श्री. राम नाईक यांचे अभिनंदन करताना उजवीकडून लेप्रसी युनियनचे मानद् अध्यक्ष डॉ. शरदचंद्र गोखले, श्री. सुरेश कौल, कुष्ठपीडितांच्या नॅशनल फोरमचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. पी. के. गोपाळ**